दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

रब्बी पिकांच्या MSP मध्ये मोठी वाढ; केंद्र सरकारचा निर्णय

नवी दिल्ली : देशातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला अधिक लाभदायक भाव मिळावा आणि रब्बी हंगामातील पिकांच्या उत्पादनाला प्रोत्साहन लाभावे, या उद्देशाने केंद्र सरकारने विपणन हंगाम 2027-28 साठी सर्व अधिदेशित रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (MSP) मोठी वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार विषयक समितीच्या बैठकीत या दरवाढीस अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे.

फटाक्यांवर पूर्णपणे बंदी घालता येणार नाही, पण... : सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली: दिवाळीच्या काळात फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांच्या वापराबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी आगामी दिवाळीच्या काळात फटाक्यांच्या वापराबाबत संतुलित दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. तसेच परवानगी असलेल्या फटाक्यांच्या प्रकारांसाठी विशिष्ट वेळा निश्चित करण्याचे संकेत दिले आहे. न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती पी.बी. वराळे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, ते फटाक्यांच्या वापरावर पूर्ण बंदी घालण्याच्या बाजूने नाहीत, कारण त्यामुळे दिवाळी साजरी करणाऱ्या लोकांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात.

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. ०२ ऑक्टोबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १६१ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

एआय प्लसकडून पल्स 2 एफई, नोव्हाटॅब आणि लॅपटॅब लाँच

मुंबई : सणासुदीच्या हंगामाच्या पार्श्वभूमीवर एआय प्लस स्मार्टफोनने पल्स २ एफई, नोव्हाटॅब आणि लॅपटॅब ही तीन नवीन उत्पादने लाँच केली आहेत. संवाद, शिक्षण, मनोरंजन आणि उत्पादकता यांसाठी ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव देण्याचा कंपनीचा उद्देश आहे. पल्स २ एफई हा पहिल्यांदा स्मार्टफोन घेणाऱ्या तसेच अपग्रेड करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी सादर करण्यात आला आहे.

घडी डिटर्जंट 'विश्वास की परीक्षा' मोहिम

मुंबई : आरएसपीएल ग्रुपने आज घडी डिटर्जंटची नवी मोहीम "विश्वास की परीक्षा" लाँच केल्याची घोषणा केली. या मोहिमेत बॉलिवूड सुपरस्टार माधुरी दीक्षित ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सहभागी झाल्या आहेत. "विश्वास की खास बात ये है कि, उसपर हमेशा खरा उतरना पड़ता है" - या विश्वासावर आधारित ही मोहीम तयार करण्यात आली आहे. विश्वासाविषयीची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यावर नेहमी खरे उतरावे लागते. हाच संदेश देत ही मोहीम, ब्रँडवर विश्वास ठेवणाऱ्या भारतातील लाखो कुटुंबांसाठी उत्पादनाचा अनुभव सातत्याने अधिक चांगला करण्याच्या घडीच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.ही मोहीम नव्याने विकसित करण्यात आलेल्या फॉर्म्युलेशनवर केंद्रित आहे, जे भारतातील शहरी आणि निमशहरी भागांमधील ग्राहकांच्या बदलत्या कपडे धुण्याच्या सवयी लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे.

श्रीलंका टुरिझम प्रोमशन ब्युरोची डेस्टिनेशन वेडिंगची खास संकल्पना

पुणे : श्रीलंका पर्यटन प्रोत्साहन ब्युरोने (एसएलटीपीबी) हैदराबाद, सुरत आणि पुणे येथे आयोजित केलेल्या तीन शहरांतील डेस्टिनेशन वेडिंग रोडशोची यशस्वी सांगता केली. या माध्यमातून भारतातील वेडिंग क्षेत्रातील व्यावसायिकांसमोर श्रीलंकेचे डेस्टिनेशन वेडिंगसाठीचे आकर्षक पर्याय आणि संधी सादर करण्यात आल्या. या रोडशोमध्ये वेडिंग प्लॅनर्स, ट्रॅव्हल क्षेत्रातील व्यावसायिक आणि प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी सहभागी झाले. या उपक्रमाद्वारे श्रीलंकेला एक प्रीमियम आणि बहुआयामी डेस्टिनेशन म्हणून सादर करण्यात आले, जिथे जोडप्यांना आपल्या विवाहसोहळ्याचे रूपांतर कुटुंबीय आणि मित्रपरिवारासोबत आनंददायी विवाहसोहळा तसेच अविस्मरणीय सुट्टीच्या अनुभवात करता येते.

एपीएसईझेडच्या कोलंबो वेस्ट टर्मिनलची क्षमता दुप्पट

मुंबई : श्रीलंकेच्या पंतप्रधान डॉ. हरिनी अमरसूर्या यांनी आज अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन (एपीएसईझेड) च्या कोलंबो वेस्ट इंटरनॅशनल टर्मिनल (सीडब्ल्यूआयटी)च्या 750 दशलक्ष अमेरिकी डॉलरच्या फेज-II विस्ताराचे उद्घाटन केले. या विस्तारामुळे सीडब्ल्यूआयटीची क्षमता 1.6 दशलक्ष टीईयूवरून वाढून 3.2 दशलक्ष टीईयू झाली आहे.

अदाणी ग्रीन एनर्जीने बॅटरी स्टोरेज क्षमता 6.63 गिगावॅट-तास पर्यंत वाढवली

मुंबई : भारतातील सर्वात मोठी अक्षय ऊर्जा कंपनी असलेल्या, अदाणी ग्रीन एनर्जी लिमिटेड'ने (एजीईएल), गुजरातमधील खावडा येथे कार्यरत बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम (बीईएसएस) ची क्षमता 6.63 गिगावॅट-तास (गिगावॅट-तास) पर्यंत वाढवली आहे. जून 2026 मध्ये ही क्षमता 3.55 गिगावॅट-तास होती. भारतातील सुमारे 12.6 गिगावॅट-तास कार्यरत बीईएसएस क्षमतेपैकी आता एजीईएलचा वाटा 50% पेक्षा जास्त आहे. या महत्त्वपूर्ण कामगिरीमुळे खावडा हे एकाच ठिकाणी कार्यरत असलेले जगातील सर्वात मोठे बॅटरी एनर्जी स्टोरेज केंद्र ठरले आहे. येथे 6.63 गिगावॅट-तास (GWh) क्षमतेची बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम (बीईएसएस) कार्यरत आहे.गुजरातमधील खावडा येथे बीईएसएस चे बांधकाम सुरू केल्यानंतर अवघ्या 14 महिन्यांत एजीईएल ने 6.63 गिगावॅट-तास क्षमतेचा टप्पा गाठला आहे. यातील नवीन क्षमता बांधकाम सुरू केल्यापासून केवळ 10 महिन्यांत कार्यान्वित करण्यात आली. खावडा येथे एजीईएलच्या अक्षय ऊर्जा प्रकल्पासोबत बीईएसएस प्रकल्प जोडण्यात आला आहे.

ब्रिजस्टोन इंडिया'च्या वतीने नाशिक येथे नवीन सिलेक्ट स्टोअर सुरू

नाशिक : महाराष्ट्रात आपल्या किरकोळ विक्रीचा विस्तार करत, जपानची समूह कंपनी ब्रिजस्टोन कॉर्पोरेशनच्या ब्रिजस्टोन इंडियाच्या वतीने नाशिकमध्ये नवीन ब्रिजस्टोन सिलेक्ट स्टोअरचे उद्घाटन करण्यात आले. सिलेक्ट स्टोअर, हिंदुस्तान टायर्स आणि ऑटो केअरचा पत्ता 48/4, नारायण बापू चौक, जुना सैखेडा रोड, अभिनव आदर्श शाळा समोर, जेलरोड, नाशिक याप्रमाणे आहे. ब्रिजस्टोन सिलेक्ट स्टोअर्सची रचना ग्राहकांना एकाच छताखाली संपूर्ण टायर आणि व्हील केअरचा अनुभव देण्यासाठी करण्यात आली आहे. प्रीमियम टायरसह, ग्राहक तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आधुनिक उपकरणे आणि सुरक्षा, आरामदायी आणि दीर्घकालीन कामगिरीवर लक्ष केंद्रित करणाऱ्या सेवांची अपेक्षा करू शकतात.

थकबाकीदारांवर दणका; एका दिवसात 43.70 लाखांचा मालमत्ताकर वसूल

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर



मोठ्या प्रमाणात मालमत्ताकर थकीत ठेवणाऱ्या मालमत्ताधारकां विरोधात महानगरपालिकेने गुरुवारी धडक कारवाई केली. शहरातील सर्व दहा झोन कार्यालयांच्या पथकांनी दिवसभरात थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्याची मोहीम राबविली. या कारवाईत १८ मालमत्ता सील करण्यात आल्या असून, विविध मालमत्ताधारकांकडून तब्बल ४३.७० लाख रुपयांचा मालमत्ताकर वसूल करण्यात आला.

मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे तसेच उपआयुक्त (कर निर्धारक व संकलक) विकास नवाळे यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली. झोन १ मध्ये दोन मालमत्ता सील करून २.०५ लाख रुपये, झोन २ मध्ये ४.५१ लाख, झोन ३ मध्ये ५० हजार, झोन ४ मध्ये दोन मालमत्ता सील करून १.०४ लाख रुपये वसूल करण्यात आले.

झोन ५ मध्ये एक मालमत्ता सील करून ३.८९ लाख रुपये, झोन ६ मध्ये एक मालमत्ता सील करून ४.०९ लाख रुपये, तर झोन ७ मध्ये एक मालमत्ता सील करून ४.७६ लाख रुपये वसूल करण्यात आले. झोन ८ मध्ये दोन मालमत्ता सील करून १.२२ लाख, झोन ९ मध्ये दोन मालमत्ता सील करून ३.५४ लाख आणि झोन १० मध्ये एक मालमत्ता सील करून १.९७ लाख रुपयांची वसुली करण्यात आली. महापालिकेने थकबाकीदारांविरोधातील ही मोहीम पुढेही सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दर गुरुवारी आणि शुक्रवारी मोठ्या थकबाकीदारांच्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे मालमत्ताधारकांनी थकीत कर तातडीने भरून अप्रिय कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त अमोल येडगे यांनी केले आहे.

शिवना ते जळकिबाजार रस्ताची लागली वाट

वाहण धारकांना मनस्ताप , दुरुस्ती कधी होणार ?

अजिंठा प्रतिनिधी सय्यद जमीर

जळकीबाजार (ता. सिल्लोड) या गावाला जाणारा रस्ताची दुरवस्था झाली असुन रस्ता खडामय बनला आहे. या रस्ताला कोणीच वाली उरल नसल्यामुळे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे रस्ताची अक्षरशः झाळणी झाली आहे. या रस्त्यावर दररोज शाळेकर विद्यार्थी ,व्यवसाय कि ,शेतकरी रोज रहदारी करता या सगळ्याना खड्डेमय रस्त्यावर जाताना अनेक आजार जडत आहे. ज्या वेळी रस्ता मंजुर होऊन काम झाले त्याचवेळी रस्ताचे काम निकृष्ट दर्जाचे झाले .संबंधित ठेकेदाराचे साधारण 5 वर्ष देखभाल जवाबदारी असते .या कालावधीत रस्तावर खड्डे दुरूस्ती चे कामे ठेकेदाराकडुन असले तरी ते संबाधित विभागकडुन याकडे सोयीस्कर दुर्लक्ष होताना दिसत आहे.

यापूर्वी अनेक तक्रारी संबंधित विभागला दिलेल्या आहे .या रस्ताने वाहण धारकांना मनस्ताप सोसावा लागत आहे . समस्या लक्षात घेत या रस्ताची दुरुस्ती करावी अन्यथा गावकर्यांनी सबोत घेऊन आंदोलन करण्यात येईल .

राजेंद्र दांडगे (माजी सरपंच जळकिबाजार)



रस्ताची पाहाणी करणार ....

रस्ताची दुरवस्था बाबत पाहाणी करण्यात येईल झालेल्या दुरवस्था बाबत संबंधितांना सुचना देण्यात येईल .

संजय शेवाळे (अभियंता ,जिल्हा परिषद)

शालार्थ आयडी घोटाळा:नाशिक विभागातील संशयित शाळांवर 11 विशेष पथकांची धडक

नाशिक : शालार्थ आयडी घोटाळ्याच्या तपासाला नाशिक शहर पोलिसांनी वेग दिला असून, नाशिक विभागातील नाशिक, जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांतील संशयित शाळांची पोलिसांकडून तपासणी सुरू आहे. पोलिसांच्या ११ विशेष पथकांनी लॅपटॉप, प्रिंटर आणि कॅमेऱ्यांसह विविध ठिकाणी अचानक भेटी देत कागदपत्रे आणि डिजिटल पुरावे संकलित करण्यास सुरुवात केली आहे.

या प्रकरणात नाशिक विभागात आढळलेल्या ८४१ संशयित शालार्थ आयडींपैकी ६३८ आयडी जळगाव जिल्ह्यातील असल्याचा तपासातील प्राथमिक दावा आहे. त्यामुळे जळगाववर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले असून, पाच विशेष पथके तेथे कार्यरत असल्याची माहिती आहे. पोलिसांच्या या कारवाईदरम्यान संबंधित शाळांमधील मस्टर, जुन्या वेतन बिले, नियुक्तिपत्रे, आवक-जावक रजिस्टर आणि इतर महत्त्वाची कागदपत्रे तपासली जात आहेत. बनावट कागदपत्रांची निर्मिती आणि वापर यासंदर्भातील डिजिटल पुरावे मिळविण्यासाठी इलेक्ट्रॉनिक उपकरणांचीही तपासणी केली जात आहे.

मार्च २०२५ मध्ये गुन्हा दाखल

या प्रकरणी मार्च २०२५ मध्ये नाशिकरोड पोलिस ठाण्यात तत्कालीन शिक्षण उपसंचालक भाऊसाहेब चव्हाण यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणात अनेक अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि संस्थाचालकांचा संशयित म्हणून समावेश असल्याचे तपास यंत्रणेकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, नाशिकरोड पोलिस ठाण्यात दाखल दोन गुन्ह्यांच्या तपासात आतापर्यंत १,२०० हून अधिक संशयितांची नावे तपासात समोर आल्याची माहिती आहे.

विवाहित तरुणीवर ऊसतोड मुकादमा कडून अमानुष अत्याचार; गुन्हा दाखल

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

परभणी:- परभणी जिल्ह्यातील अनेक कामगार ऊस तोडी साठी जात असतात त्याच्यातून ऊस तोड कामगारव ऊसतोड मुकदम यांचे रोजंदारीमुळेहित संबंध असतात त्याचाच गैरफायदा घेऊन ऊसतोड मुकादमाने एक 25 वर्षीय विवाहिततरुणी घरात एकटीच असल्याचे पाहून तिच्या घरात प्रवेश करून तिच्यावर बळजबरीने दिनांक 30 सप्टेंबर बुधवार रोजी दुपारी घडली.

याप्रकरणी दिनांक 1 ऑक्टोबर गुरुवार रोजी पहाटे दोन वाजून 40 च्या सुमारास गंगाखेड पोलीस ठाण्यात अमानुष अत्याचारासह ॲट्रॉसिटी चा विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की गंगाखेड तालुक्यात पोलीस ठाण्याच्या हद्दीतील असलेले पण सोनपेठ तालुक्यातील एक गावातील विवाहित तरुणी व तिचा पती ऊसतोड कामगार म्हणून अंबाजोगाई तालुक्यातील येरवडा येथील बबन सातपुते यांच्या ट्रॅक्टर वर कामाला जात होते परंतु गेल्या वर्षी ऊस तोडीच्या कामावरून परत आल्यानंतर वारंवार घरी येऊन बबन सातपुते आणि यावर्षी सुद्धा ऊस तोडीसाठी ट्रॅक्टर वर जायचे सांगितले 30 सप्टेंबर बुधवार रोजी सकाळी 11 वाजता विवाहितेच्या पतीने फोन करून बबन सातपुते यांच्याकडे किराणा सामान भरण्यासाठी दोन हजार रुपयाची मागणी केली यावर बबन सातपुते यांनीतुम्ही गंगाखेड येथे महा-ई-सेवा केंद्रावर जाऊन मला फोन लावा मी ऑनलाईन पैसे टाकतो असे सांगितले विवाहितेचा पती पैशासाठी गंगाखेड येथे आले असता दुपारी एक वाजेच्या सुमारास बु बबन सातपुते हा पीडित महिलेच्या घरी येऊन गोड गोड बोलून ऊस तोडी साठी जाताना किराणा सामान भरून देतो अंबाजोगाई येथे तुम्हा दोघांना कपडे करतो असे म्हणाला व घरात एकटी असलेली विवाहिता व तिचे मूल उठल्याने त्याला घरात गेली असता यावेळी बबन सातपुते याने बळजबरीने विवाहितेच्या वर अमानुष अत्याचार केला विवाहितेने आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केला असता तिचे तोंड दाबून हा अत्याचार केला व घडलेला प्रकार कोणाला सांगितले तर तुला व तुझ्या पतीला व मुलाला खतम करून टाकतो असे म्हणत जीवे मारण्याची धमकी देत बबन सातपुते घरातून निघून गेला या प्रकरणी पिढी तिच्या तक्रारीवरून बबन सातपुते यांच्यावर गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्निल राठोड हे अधिक तपास करत आहेत .

नदीत विसर्जन नाही, मातीत जपणूक; सोनवणे कुटुंबीयांचा अनोखा उपक्रम; शतकोसी मातेच्या स्मृतीत शेतात लावले वृक्ष

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर



परंपरेच्या चौकटी मोडत आणि समाजाला एक नवी दिशा देत तालुक्यातील सिल्लोड येथे एका शतकोसी मातेला अत्यंत पर्यावरणपूरक पद्धतीने निरोप देण्यात आला आहे. वृद्धापकाळाने निधन झालेल्या आईच्या रक्षेचे पारंपरिक पद्धतीने नदीत विसर्जन न करता, सोनवणे कुटुंबीयांनी त्यांच्या शेतात वृक्षारोपण करून अनोख्या व प्रेरणादायी पद्धतीने श्रद्धांजली अर्पण केली आहे. या अभिनव उपक्रमाची संपूर्ण परिसरात चर्चा सुरू असून मृत्यूनंतरही निसर्ग संवर्धनाचा संदेश दिल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

सिल्लोड येथील हरणाबाई संपतराव सोनवणे यांचे वयाच्या १०० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. आईच्या निधनानंतर त्यांच्या उत्तरकार्यादरम्यान किंवा अंत्यसंस्कारांनंतर रक्षेचे पारंपरिक पद्धतीने नदीत विसर्जन करण्याऐवजी काहीतरी वेगळे आणि समाजोपयोगी करावे, असा विचार सोनवणे कुटुंबीयांनी केला. हरणाबाई यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात आणि या माध्यमातून पर्यावरणाचे रक्षण व्हावे, या उदात्त हेतूने त्यांच्या शेतामध्ये वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेण्यात आला. ठरल्याप्रमाणे शेतात झाडे लावून त्याठिकाणी रक्षेचा योग्य वापर करण्यात आला, ज्यामुळे या वृक्षांच्या माध्यमातून आईची स्मृती कायमची जिवंत राहणार आहे.

या पर्यावरणपूरक आणि प्रेरणादायी उपक्रमात सोनवणे कुटुंबीयांसोबतच परिसरातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी माजी गटशिक्षणाधिकारी फाळके साहेब, शिवशारदा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष कृष्णा लहाने सर, नगरसेवक सुधाकर गायकवाड, बारा बलुतेदार संघटनेचे पदाधिकारी जगदीश दादा बेडवे, कृष्णा वाघ, लुटे साहेब, कैलास डमाळे आदींसह अनेक जण उपस्थित राहून या उपक्रमाला पाठिंबा दिला.

यावेळी कुटुंबातील तेजराव संपतराव सोनवणे, राधाबाई तेजराव सोनवणे, कौतिकराव संपतराव सोनवणे, कडूबाई कौतिकराव सोनवणे, रवींद्र तेजराव सोनवणे, अर्चना रवींद्र सोनवणे, अरविंद तेजराव सोनवणे, स्वाती अरविंद सोनवणे, सचिन कौतिकराव सोनवणे, स्वप्नाली सचिन सोनवणे, संजय शिरसाठ, अनिल वाघ, सुशील इंगळे तसेच मुली, जावई, नातवंडे, पणतू आणि इतर नातेवाईक उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत हा पर्यावरण रक्षणाचा संकल्प पूर्ण करण्यात आला.

पुण्यातील 8 विद्यार्थी समुद्रात बुडून मृत

रायगड : रायगड जिल्ह्यातील अत्यंत लोकप्रिय आणि सुंदर असलेल्या दिवेआगर बीचवर एक अत्यंत हृदयद्रावक आणि दुर्दैवी दुर्घटना घडली आहे. समुद्रात पोहण्यासाठी उतरलेल्या पुण्यातील एका खासगी कोचिंग क्लासच्या सहलीतील 8 विद्यार्थ्यांचा पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे पुण्यासह दिवेआगर परिसरात मोठी शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील आळंदी परिसरातील 'विनर्स' या खासगी कोचिंग क्लासची सहल विद्यार्थ्यांसह दिवेआगर येथे आली होती. आनंदाने आणि उत्साहात सुरू असलेली ही सहल एका क्षणात काळीकुट्ट ठरली. सहलीदरम्यान काही विद्यार्थी समुद्राचा आनंद लुटण्यासाठी आणि पोहण्यासाठी पाण्यात उतरले होते. मात्र, पाण्याचा खोलीचा नेमका अंदाज न आल्याने हे 8 विद्यार्थी अचानक खोल पाण्यात ओढले गेले आणि पाण्यात बुडाले. विद्यार्थी समुद्रात बुडाल्याचे लक्षात येताच बीचवर एकच हलकल्लोळ उडाला. घटना समजताच बीचवर उपस्थित असलेल्या 'महाकाली वॉटर स्पोर्ट्स'च्या सतर्क कर्मचाऱ्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी कसलाही विलंब न करता तातडीने समुद्रात धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य वेगाने राबवण्यात आले आणि बुडालेल्या सर्व विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्यात आले. शर्थीच्या प्रयत्नांनंतर आठही जणांना पाण्यातून बाहेर काढण्यात यश आले, परंतु दुर्दैवाने उशीर झाल्यामुळे पाण्याचा दाब आणि गुदमरल्यामुळे या सर्व 8 विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला होता. एकाच क्लासमधील 8 तरुण विद्यार्थ्यांचा असा अचानक अंत झाल्यामुळे मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांवर आणि मित्रपरिवारावर मोठा आघात झाला असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटनासाठी जाताना सुरक्षेच्या नियमांचे पालन करणे आणि लहान मुलांच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घेणे किती गरजेचे आहे, यावर या दुर्घटनेने पुन्हा एकदा प्रकाश टाकला आहे.

जिल्ह्यातील 850 नवीन महा-ई-सेवा केंद्राला उच्च न्यायालयाची स्थगिती

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

अखिल स्तरीय महा ई-सेवा आणि आधार केंद्र संघटनेतर्फे दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकेची गंभीर दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने नवीन 'आपले सरकार सेवा केंद्र' स्थापनेसाठी काढण्यात आलेल्या जाहिरातीच्या प्रक्रियेला अंतरिम स्थगिती दिली आहे. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, न्यायालयाच्या पुढील आदेशाशिवाय १३ ऑगस्ट २०२६ रोजीच्या जाहिरातीनुसार कोणतीही अंतिम प्रक्रिया पूर्ण केली जाऊ नये.

या प्रकरणाची सुनावणी औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठासमोर झाली. याचिकाकर्ता संघटनेतर्फे युक्तिवाद करताना असे निदर्शनास आणून देण्यात आले की, नवीन केंद्र स्थापन करण्यापूर्वी १९ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयातील विहित नियमांचे व प्रक्रियेचे पालन करण्यात आलेले नाही. तसेच, जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी कोणत्याही प्रकारचा स्थानिक सर्वेक्षण करण्यात आलेला नाही, ज्यामुळे आधीपासून कार्यरत असलेल्या केंद्रांच्या अस्तित्वावर व आर्थिक स्थैर्यावर मोठा विपरीत परिणाम होत आहे.

याचिकाकर्त्यांनी असाही आक्षेप घेतला की, २७ मार्च २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी २५ हजार लोकांमागे दोन केंद्रे, तर इतर महानगरपालिका व नगर परिषद क्षेत्रांमध्ये १० हजार लोकांमागे दोन केंद्रे देण्याची तरतूद आहे. मात्र, नगर परिषद क्षेत्रात ५ हजार लोकांमागे चार केंद्रे अशी विसंगत व अव्यवहारी रचना करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या दूरसंसंचार आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या कॉमन सर्व्हिस सेंटर मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे, ग्रामपंचायत क्षेत्रात अतिरिक्त केंद्र सुरू करण्यापूर्वी स्थानिक गरजा, व्यवहार्यता आणि वित्तीय स्थैर्याची मागणी विश्लेषणाद्वारे तपासणे बंधनकारक असताना, तसे कोणतेही तांत्रिक किंवा आर्थिक सर्वेक्षण न करताच ही घाईघाईने जाहिरात काढण्यात आली आहे.

याशिवाय, केंद्र चालकांच्या व्यवहारांमधून मिळणाऱ्या कमिशनमधील किमान ८० टक्के रक्कम तातडीने देणे बंधनकारक असताना ती रक्कम अत्यंत विलंबाने अदा केली जात असल्याचा मुद्दाही न्यायालयासमोर मांडण्यात आला. यासंदर्भातील १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीतील पेमेंटचा तपशील असलेला चार्ट देखील याचिकाकर्त्यांनी न्यायालयात सादर केला. दोन्ही बाजूंच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने प्रतिवाद्यांना नोटीस बजावून उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी २८ ऑक्टोबर २०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

कॅप्टन स्मित माछर यांचे असीम धैर्य आणि वैमानिकाचे कर्तव्य

विमान प्रवासादरम्यान एखादे गंभीर संकट ओढवणे आणि त्याही परिस्थितीत स्वतःवर प्राणघातक हल्ला झालेला असताना तब्बल १८० प्रवाशांचे प्राण सुरक्षितपणे वाचवणे, ही केवळ एक घटना नसून अफाट धैर्य आणि कर्तव्यनिष्ठेचे एक दुर्मिळ उदाहरण आहे. फ्लाय दुबई (Flydubai) विमानाचे पायलट कॅप्टन स्मित माछर यांनी अत्यंत बिकट आणि जीवघेण्या परिस्थितीत दाखवलेले विलक्षण प्रसंगावधान संपूर्ण देशासाठी आणि विशेषतः महाराष्ट्रासाठी सार्थ अभिमानाची बाब ठरले आहे. स्वतः गंभीर जखमी असतानाही विमानाचे नियंत्रण न गमावता, प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे हा वैमानिक धर्माचा एक अत्यंत उतुंग आदर्श त्यांनी वस्तुपाठासारखा घालून दिला आहे. आकाशात हजारो फूट उंचावर असताना अशा प्रकारचा जीवघेणा प्रसंग ओढवणे म्हणजे प्रवाशांच्या आणि विमानाच्या सुरक्षेवर थेट घाला येण्यासारखे होते. अशा वेळी किंचितशी भीती किंवा निर्णयातील एक सेकंदाची चूकसुद्धा शेकडो जीव धोक्यात घालू शकली असती. मात्र, कॅप्टन स्मित यांनी स्वतःच्या वेदनांकडे आणि जीवाची पर्वा न करता अत्यंत संयमाने, तांत्रिक कौशल्याने आणि धैर्याने सर्व परिस्थिती हाताळली. गंभीर दुखापत झालेली असतानाही त्यांनी घेतलेले अचूक निर्णय आणि दाखवलेले प्रसंगावधान यामुळेच १८० प्रवाशांचे प्राण वाचू शकले, तसेच या भीषण संकटाच्या काळात विमानातील प्रवाशांनीही एका संघभावनेने (टिमवर्क) दिलेले सहकार्य कौतुकास्पद ठरले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅप्टन स्मित माछर यांचा 'खरा हिरो' असा केलेला गौरव आणि दिलेले अभिनंदन संदेश हे प्रत्येक भारतीयाच्या भावनेचे प्रतीक आहे. आजच्या काळात जेव्हा संकटाच्या प्रसंगी लोक गोंधळून जातात, तिथे मुंबईच्या या सुपुत्राने दाखवलेले शौर्य आणि कर्तृत्व देशातील तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. कॅप्टन स्मित यांनी दाखवलेले हे धाडस केवळ एका दुर्घटनेतून बचाव करण्यापुरते मर्यादित नसून, ते मानवी जिद्द, कर्तव्यनिष्ठा आणि शौर्याचे एक अमर प्रतीक बनले आहे. ते लवकरात लवकर पूर्णपणे बरे होऊन पुन्हा एकदा आकाशात झेप घेतील, या सदिच्छांसह त्यांच्या या अचाट साहसाला संपूर्ण देशाचा सलाम आहे.

सामुदायिक विज्ञान शिक्षणातून ग्रामीण समाजाच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण कराव्यात : कुलगुरू प्रा. डॉ. इन्द्र मणि

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी :-वनामकृविच्या परभणी येथील सामुदायिक विज्ञान महाविद्यालयात दीक्षारंभ आणि पालक मेळावा संपन्न

कोणत्याही कामाची सुरुवात चांगली झाली, तर अर्धे काम पूर्ण झालेले असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाची सुरुवात सकारात्मक आणि योग्य दिशेने होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये दीक्षारंभ कार्यक्रमाचा समावेश करण्यात आला असून, हा दोन आठवड्यांचा अभ्यासक्रम आहे. या कालावधीत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षणातून काय मिळवायचे, आपले व्यक्तिमत्त्व कसे घडवायचे आणि भविष्यात समाजासाठी काय योगदान द्यायचे, याचा विचार करावा, असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या परभणी येथील सामुदायिक विज्ञान महाविद्यालयात दिनांक १ ऑक्टोबर २०२६ रोजी पदवी प्रथम वर्षाच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी 'दीक्षारंभ-२०२६' आणि पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच विविध विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांची माहिती व्हावी, या उद्देशाने आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन व अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी भूषविले. यावेळी ते मार्गदर्शन करत होते.

माननीय कुलगुरूंनी महाविद्यालयाच्या इतिहासाचा उल्लेख करताना सांगितले की, या महाविद्यालयाचे पूर्वी गृहविज्ञान महाविद्यालय असे नाव होते. काळानुरूप आणि समाजाच्या बदलत्या गरजांनुसार त्याचा विस्तार होऊन आता त्याला सामुदायिक विज्ञान महाविद्यालय असे स्वरूप प्राप्त झाले आहे. स्त्री-पुरुष समानता आणि समाजातील सर्व घटकांचा सहभाग



वाढविण्यासाठी सामुदायिक विज्ञानाचे शिक्षण महत्त्वपूर्ण आहे. महिलांमध्ये जबाबदारीची भावना, कुटुंबाची काळजी घेण्याची वृत्ती आणि व्यवस्थापन कौशल्ये प्रकर्षाने दिसून येतात. कुटुंबातील महिलांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेमुळे शिस्त, एकसूत्रता आणि समन्वय निर्माण होण्यास मदत होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

समुदायाची मूलभूत संकल्पना विद्यार्थ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे. लोकांचा समूह म्हणजे समुदाय किंवा 'कम्युनिटी'. या समुदायामध्ये संवाद, आपुलकी, मानसन्मान आणि परस्परांचा आदर असणे आवश्यक आहे. सामुदायिक विज्ञानाच्या माध्यमातून ही मूल्ये समाजामध्ये रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करता येते, असेही त्यांनी नमूद केले.

भविष्यात ग्रामीण भागातील महिला व बालकांच्या आरोग्यविषयक शिक्षणावर विशेष भर देण्याची गरज व्यक्त करताना त्यांनी महाविद्यालयातील ज्ञानाचे विकेंद्रीकरण करण्याचे आवाहन केले. गावागावांत व्यक्तींना प्रशिक्षित करून आरोग्यविषयक सेवा, मार्गदर्शन आणि जनजागृती करणाऱ्या स्थानिक कार्यकर्त्यांची निर्मिती करावी, असे त्यांनी सांगितले.

महाविद्यालयाच्या 'गृहविज्ञान' ते 'सामुदायिक विज्ञान' या नामांतराच्या प्रक्रियेत काही अडचणी निर्माण झाल्या होत्या; मात्र विद्यापीठ प्रशासनाने योग्य लक्ष घालून हा विषय मार्गी लावला. आज या महाविद्यालयातील विद्यार्थी महाराष्ट्रातील विविध शासकीय रुग्णालये व संस्थांमध्ये आहारतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत, ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

सामुदायिक विज्ञानाचा अभ्यासक्रम अधिक समाजाभिमुख करण्यासाठी दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करून अभ्यासक्रमाचा आढावा घ्यावा आणि आवश्यक ते बदल करावेत. विशेषतः ग्रामीण मराठवाड्यातील समाजाच्या गरजा लक्षात घेऊन हा अभ्यासक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश त्यांनी दिले. महाविद्यालयातील पूर्व-प्राथमिक प्रयोगशाळेमुळे महाविद्यालयाला राष्ट्रीय स्तरावर विशेष ओळख प्राप्त झाली आहे, असे सांगून त्यांनी 'स्कूल कनेक्ट'सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून प्राथमिक शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थी तसेच पालकांना महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांशी अनौपचारिक पद्धतीने जोडण्याचे आवाहन केले.

आज समाजातील आनंदाचे प्रमाण कमी होत चालले असून उच्चशिक्षित समाजातही ही बाब जाणवते. अनेकदा अहंकार आणि स्वार्थ आपल्याला आनंदापासून दूर नेतात. त्यामुळे अहंकार बाजूला ठेवून साधेपणाने जगण्याची वृत्ती जोपासली पाहिजे. महाविद्यालयाच्या माध्यमातून 'हॅपीनेस' विषयक उपक्रम राबवून आनंदाचे शास्त्र आणि त्याचे मॉडेल समाजापर्यंत पोहोचवावे, असे त्यांनी सांगितले.

भविष्यातील गरजा लक्षात घेऊन जनसमुदायासाठी परिवर्तनशील शिक्षण देण्याची गरज व्यक्त करताना पारंपरिक ज्ञानाचाही उपयोग करण्याचे आवाहन त्यांनी केले. 'आजीबाईचा बटवा' यांसारख्या पारंपरिक ज्ञानसंपदेचे शास्त्रीय पद्धतीने जतन करून त्याचा समाजोपयोगी वापर करावा, असे त्यांनी नमूद केले.

परभणी जिल्ह्यात श्रमदान, स्वच्छता व आरोग्य शिबिरांमध्ये वाढतोय लोकसहभाग

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी: जिल्ह्यात सुरू असलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत ग्रामपंचायत, शाळा, आरोग्य संस्था आणि नागरिकांच्या सहभागातून विविध लोकाभिमुख उपक्रम उत्साहात राबविण्यात येत आहेत. श्रमदान व स्वच्छता मोहिमा, आरोग्य शिबिरे, मानवी साखळी, वक्तृत्व व चित्रकला स्पर्धा अशा विविध उपक्रमांतून स्वच्छता, आरोग्य, सामाजिक बांधिलकी आणि जनजागृतीचा संदेश देण्यात येत आहे.

जिल्ह्यात सेवा संकल्प अभियान जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. त्याला विद्यार्थी, तरुण वर्ग आणि गावकऱ्यांचाही मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभत आहे.

जिल्हा परिषद परभणी आणि स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, पंचायत समिती सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने आज सेवा संकल्प अभियान अंतर्गत ग्रामपंचायत ब्रम्हवाकडी येथे एक दिवस एक तास, श्रमदान मोहीम राबविण्यात आली. यावेळी स्वच्छताग्रही सतीश शेरे, पालक अधिकारी अनिल मुळे, ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती हेळगिरे, नानाभाऊ वणवे, स्वच्छ भारत मिशनचे समन्वयक डी आर कामीटे व गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

पालम तालुक्यातील शेखराजूर आणि धनेवाडी येथे गावकऱ्यांच्या सहभागातून श्रमदान मोहीम राबविण्यात आली. जिंतूर तालुक्यातील निवळी खुर्द येथेही सेवा संकल्प अभियानांतर्गत श्रमदान करण्यात आले तर पाथरी



तालुक्यातील कानसूर येथे 'श्रमदान दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला.

ग्रामपंचायत वझर बुद्रुक येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आपले विचार मांडत सामाजिक संदेश दिला. वझर बुद्रूक येथे विविध स्पर्धांच्या माध्यमातून स्वच्छता मोहिम राबवत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यात आला आहे. सेवा संकल्प अभियानांतर्गत आयुष्मान आरोग्य मंदिर, चुडावा येथे 'आरोग्य सेवा संकल्प अभियान शिबिर-२०२६' आयोजित करण्यात आले होते. तसेच उपकेंद्र आरखेड येथेही आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्यविषयक सेवा व मार्गदर्शन करण्यात आले.

कानसूर येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. मानवी साखळी, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आदी उपक्रमांतून नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक विषयांबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

मानवत तालुक्यातील सरोदेसावळी येथे आयोजित आरोग्य उपक्रमात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. शिबिरातील पहिल्या महिला रक्तदात्या म्हणून श्रीमती सरोदे यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. तसेच रत्नापूर येथेही सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टाकळी कुंभकर्ण येथे विविध उपक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग राहिल्याने अभियानाला शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची जोड मिळाली. गावागावांत नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व आरोग्य यंत्रणेच्या सहभागातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांमुळे 'सेवा संकल्प' हा केवळ अभियान न राहता लोकसहभागातून सामाजिक परिवर्तनाची चळवळ बनत असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून येत आहे.

परभणी जिल्ह्यातील 26,635 शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा

264.85 कोटींची रक्कम बँकेत जमा

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी : "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६" अंतर्गत जाहीर झालेल्या तिसऱ्या यादीत परभणी जिल्ह्यातील २६ हजार ६३५ शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी २६४.८५ कोटी रुपयांची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये जमा करण्यात आली आहे.

राज्य शासनाने यापूर्वी परभणी जिल्ह्यातील आधार प्रमाणीकरण केलेल्या शेतकऱ्यांपैकी 52 हजार 583 पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यामध्ये रुपये 408.06 कोटी इतकी रक्कम वितरित केली आहे.

आज दि. 1 ऑक्टोबर रोजी तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये परभणी जिल्हयातील एकूण 26 हजार 635 शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यामध्ये रुपये 264.85 कोटी रक्कम जमा करण्यात आली आहे.

आतापर्यंत जिल्ह्यातील एकूण 79 हजार 218 शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यामध्ये रुपये 672.91 कोटी इतकी रक्कम जमा झाली आहे.

उर्वरित आधार प्रमाणीकरण केलेल्या शेतकऱ्यांची रक्कमही लवकरच वितरित होणार आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी अजुनही आधार प्रमाणीकरण केलेले नाही, त्यांनी तात्काळ आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन प्रशासनाने केलेले आहे.

नवीन उती संवर्धन प्रयोगशाळांसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी: एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२६-२७ अंतर्गत क्षेत्र विस्तार कार्यक्रमामध्ये नवीन उती संवर्धन प्रयोगशाळा स्थापन करण्यात येणार असून, त्या स्थापन करू इच्छिणाऱ्या संबंधित संस्था व घटकांनी महाडीबीटी पोर्टल mahadbtmahait.gov.in वर 'फलोत्पादन'वर अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी भास्कर कोळेकर यांनी केले आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील राज्यातील कृषी विद्यापीठे तसेच इतर शासकीय व शासन अंगीकृत संस्थांना नवीन उती संवर्धन प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या १०० टक्के अनुदान, कमाल २५० लाख रुपयांपर्यंत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संबंधित प्रयोगशाळेने उपलब्ध उत्पादन तंत्रज्ञानाच्या आधारे मान्यता असलेल्या पिकांची किमान २५ लाख रोपे उत्पादित करणे आवश्यक आहे. आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध असलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांनाच नवीन उती संवर्धन प्रयोगशाळा मंजूर करण्यात येईल. तर खासगी क्षेत्रासाठी प्रकल्प खर्चाच्या ४० टक्के अनुदान, कमाल १०० लाख रुपयांपर्यंत प्रति प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अंतर्गत उभारण्यात येणारा प्रकल्प बँक कर्जाशी निगडित असणे आवश्यक आहे. खासगी क्षेत्रातील प्रयोगशाळेलाही मान्यताप्राप्त पिकांची किमान २५ लाख रोपे उत्पादित करणे बंधनकारक राहील.

तसेच, उती संवर्धन प्रयोगशाळेला जैवतंत्रज्ञान विभागाच्या निर्धारित मानके व निकषांनुसार अनुदान मिळाल्यापासून १८ महिन्यांच्या आत मानांकन प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक राहणार आहे. योजनेच्या अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषि विभागाकडून करण्यात आले आहे.

गांधी जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. १ : महात्मा गांधी यांच्या १५७ व्या जयंतीनिमित्त महात्मा गांधी मिशन विद्यापीठात शुक्रवार, दिनांक २ ऑक्टोबर २०२६ रोजी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये रक्तदान शिबिर, 'अहिंसा परमो धर्म' प्रदर्शन, आंतरधर्मीय प्रार्थना, भजन आणि 'पैशाच झाड' एकांकिकेचे सादरीकरण करण्यात येणार आहे. रुक्मिणी सभागृह येथे सकाळी ८ वाजता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात होईल. त्यानंतर एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन होईल. ज्येष्ठ विचारवंत शेषराव चव्हाण आणि एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ यांच्या हस्ते 'अहिंसा परमो धर्म' प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यानंतर आंतरधर्मीय प्रार्थना, भजन तसेच 'पैशाच झाड' ही एकांकिका सादर होणार आहे.

परभणी जिल्ह्यात 'नो मॅपिंग' व 'लॉजिकल डिस्क्रेपन्सी' असलेल्या मतदारांना प्रत्यक्ष सुनावणीस उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही

बीएलओ घरी जाऊन कागदपत्रे संकलित करणार; अपवादात्मक प्रकरणांतच सुनावणी

हिंदु प्रकाश वार्ता /परभणी

परभणी : भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक २६ सप्टेंबर २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार तसेच दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या सुधारित निर्देशांच्या अनुषंगाने, परभणी जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेदरम्यान जुळवणी न झालेले (No Mapping) किंवा जुळवणीमध्ये तार्किक विसंगती (Logical Discrepancy) असलेल्या मतदारांबाबत महत्त्वपूर्ण सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार, ज्या मतदारांना सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे, अशा मतदारांना आता प्रत्यक्ष सुनावणीस उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही. संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन आवश्यक कागदपत्रे व पुरावे संकलित करतील. तसेच संबंधित मतदारांना आवश्यक कागदपत्रे व्हॉट्सॲपच्या माध्यमातूनही संबंधित BLO कडे सादर करता येतील.

तार्किक विसंगती असलेल्या प्रकरणांमध्ये केवळ संबंधित विसंगतीशी निगडित कागदपत्रे प्राप्त करून किंवा BLO यांच्या पडताळणी अहवाल अथवा पंचनाम्याच्या आधारे मतदार नोंदणी अधिकारी / सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्यामार्फत निर्णय घेण्यात येईल.

केवळ अपवादात्मक प्रकरणांमध्ये, म्हणजेच विहित कागदपत्रे उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेणे शक्य नसल्यास, संबंधित मतदार नोंदणी अधिकारी / सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्यामार्फत शक्यतो ऑनलाइन पद्धतीने सुनावणी घेण्यात येईल. अशा सुनावणीस संबंधित मतदार किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणतीही प्रौढ व्यक्ती उपस्थित राहू शकते. मतदार नोंदणीसाठी दिनांक ३, ४, १० व ११ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित मतदान केंद्रनिहाय विशेष शिबिरांमध्येही नोटीस प्राप्त मतदारांना आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करता येणार आहेत.

जिल्ह्यातील बेघर मतदार, कामगार, गरीब व्यक्ती, आदिवासी समाजातील विशेषतः PVTG गटातील व्यक्ती, अनाथ गटातील मतदार तसेच इतर असुरक्षित घटकांतील मतदारांसाठी विशेष शिबिरे व मदत कक्ष आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, कोणताही पात्र मतदार मतदार यादीत समावेशापासून वंचित राहू नये, यासाठी परभणी जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांनी विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पुरेसे पुरावे उपलब्ध नसलेल्या किंवा प्राप्त कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेणे शक्य नसलेल्या प्रकरणांमध्ये पुढील कार्यवाही करण्यापूर्वी संबंधित मतदारास आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची संधी देणे, आवश्यकतेनुसार सुनावणी घेणे व त्यानंतर नियमानुसार आदेश पारित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

मतदारांशी संपर्क साधणे व आवश्यक कागदपत्रे संकलित करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांनी राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींशी समन्वय ठेवावा, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

तरी, परभणी जिल्ह्यातील संबंधित सर्व मतदारांनी आवश्यक कागदपत्रे संकलित करण्यासाठी घरी येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे. पात्र मतदारांचा मतदार यादीतील समावेश सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

वाढदिवसापेक्षा सद्गुणांचा संकल्प करा : आचार्य हेमसागरजी महाराज

मेणबत्ती विझवून केक कापण्यापेक्षा वाईट प्रवृत्ती सोडण्याचा संकल्प करा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : पाश्चात्त्य पद्धतीने मेणबत्ती विझवून आणि केक कापून वाढदिवस साजरा करण्यापेक्षा आपल्या जीवनातील एखादी वाईट प्रवृत्ती सोडण्याचा संकल्प करा. साधू-संतांच्या जन्मजयंती अथवा अवतरण दिनी असा संकल्प केल्यास त्या दिवसाचा खरा उद्देश साध्य होईल, असे प्रतिपादन सिद्धांत चक्रवर्ती परमपूज्य आचार्य श्री १०८ हेमसागरजी महाराज यांनी केले.

आर्यनंदी कॉलनी, वेदांतनगर परिसरातील श्री १००८ चंद्रप्रभु खंडेलवाल दिगंबर जैन मंदिरात आचार्यश्रींच्या ६९व्या अवतरण दिनानिमित्त आयोजित धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात ते बोलत होते. विविध धार्मिक विधी, भजन, भावपूर्ण नाटिका आणि विनयांजलीने हा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. जैन समाजासह अजैन बांधवांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेत आचार्यश्रींना विनयांजली अर्पण केली.

आचार्यश्री म्हणाले, माणसाने पक्ष्याप्रमाणे आकाशात उडणे आणि माशाप्रमाणे समुद्रात पोहणे शिकले; मात्र माणूस म्हणून जीवन जगताना माणुसकी शिकणे विसरला. आधुनिक प्रगतीसोबत माणुसकी, संवेदना, संयम आणि सदाचार यांचे जतन होणे गरजेचे आहे. जीवनातील दोष दूर करून सद्गुणांचा स्वीकार करणे हीच खरी धार्मिक साधना आहे, असे त्यांनी सांगितले.

भावपूर्ण नाटिकेतून जीवनप्रवासाचे दर्शन

अवतरण दिनानिमित्त बहू मंडळ, नवयुवक मंडळ आणि २५ बालकलाकारांनी सादर



केलेल्या भावपूर्ण नाटिकेतून आचार्यश्रींच्या बालपणापासून तप, त्याग, साधना आणि आध्यात्मिक जीवनप्रवासातील विविध प्रसंग साकारण्यात आले. प्रभावी अभिनय, नृत्य, कोरिओग्राफी, संवाद आणि आधुनिक एआय तंत्रज्ञानाचा कल्पक वापर यामुळे नाटिकेला विशेष रंगत आली.

नाटिका सुरू असताना आचार्यश्रींच्या चेहऱ्यावर उमटलेले प्रसन्न हास्य आणि समाधानाचे भाव उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते. कलाकारांसह बहू मंडळ, नवयुवक मंडळ आणि आयोजन समितीने घेतलेल्या परिश्रमांचे उपस्थितांनी कौतुक केले.

लेझीम-ढोलच्या गजरात स्वागत

मंदिरात आचार्यश्रींचे आगमन होताच लेझीम व ढोल पथकाच्या गजरात आणि आकर्षक रांगोळीने त्यांचे स्वागत करण्यात आले. अनन्या पहाडे व आशिका जैन यांनी मंगलाचरण केले. शैलेश पहाडे व वैशाली पहाडे यांच्या धार्मिक भजनांनी वातावरण भक्तिमय केले.

आचार्य पादप्रक्षालनाचे सौभाग्य विशाल चांदमलजी पाटणी यांना लाभले. पिच्छीचे सौभाग्य महेंद्र 'पप्पू' ठोले, कसाबखेडा, कमंडलूचे नितीन चुडीवाल, शास्त्रभेटीचे सुंनदा रितेश पाटणी, तर आरतीचे सौभाग्य सर्वेश लोहाडे, खेतली यांना मिळाले. मुख्य सौधर्म इंद्र होण्याचा मान प्रशांत शांतिलालजी साहूजी परिवाराला मिळाला.

यावेळी आयपीएस अधिकारी अर्पित जैन आणि उद्योजक राकेश जैन यांनी ऑनलाइन माध्यमातून विनयांजली अर्पण केली. गुरुभक्तांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय पापडीवाल आणि दिनेश सेठी यांनी केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

सन्मानपूर्वक निरोप : किराडपुरा मनपा शाळेचा चेहरामोहरा बदलण्यात खान रईसा बेगम यांचे मोलाचे योगदान : महापौर समीर राजूरकर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिकेच्या किराडपुरा येथील के. प्रा. व मा. शाळा क्रमांक १च्या मुख्याध्यापिका तथा विस्तार अधिकारी खान रईसा बेगम यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र येथे सन्मानपूर्वक निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. त्यांच्या सेवाकाळातील योगदानाबद्दल मान्यवरांनी गौरवोद्गार काढत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरीये, विरोधी पक्षनेता अब्दुल समीर साजिद, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, मनपा आयुक्त अमोल येडगे, नगरसेवक ओसामा कदीर मौलाना, वसीम अहमद, अब्दुल्ला हिलाबी, सोहेल खान, नगरसेविका तरन्नुम अकील अहमद, उपआयुक्त अंकुश पांढरे, जालना मनपा उपआयुक्त नंदा गायकवाड, तत्कालीन उपआयुक्त अय्युब खान यांच्यासह शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी, सहकारी व मित्रपरिवार उपस्थित होते.



महापौर समीर राजूरकर म्हणाले, "खान रईसा बेगम यांनी सेवाकाळात अत्यंत निष्ठेने आणि समर्पण भावनेने काम केले. महापालिका शाळेच्या विकासासाठी असलेली त्यांची तळमळ त्यांच्या कार्यातून दिसून येते. त्यांचे कार्य इतर शिक्षकांसाठी निश्चितच आदर्श ठरेल." किराडपुरा शाळेच्या विकासात तत्कालीन उपआयुक्त अय्युब खान यांचेही योगदान राहिल्याचे त्यांनी नमूद केले.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी खान रईसा बेगम यांच्या कार्याचे कौतुक केले. "समर्पित शिक्षक आणि मुख्याध्यापक प्रत्येक महापालिका व शासकीय शाळेत असणे गरजेचे आहे. महापालिका शाळांच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा केला. किराडपुरा शाळेचा चेहरामोहरा बदलण्यात रईसा बेगम यांचे मोठे योगदान आहे. या कामाचे श्रेय त्यांना जाते," असे ते म्हणाले.

मनपा आयुक्त अमोल येडगे म्हणाले, "खान रईसा बेगम यांच्यासोबत काम करण्याची संधी मला फार काळ मिळाली नाही. मात्र, त्यांनी यापूर्वी केलेल्या कामाचा आढावा घेतल्यानंतर त्यांच्या कार्याची व्याप्ती आणि गुणवत्ता लक्षात येते. त्यांनी केलेले काम भविष्यातील शिक्षक आणि मुख्याध्यापकांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल."

यावेळी ओसामा कदीर मौलाना, अंकुश पांढरे आणि अय्युब खान यांनीही मनोगत व्यक्त केले. सहकारी शिक्षक व विद्यार्थ्यांनी खान रईसा बेगम यांच्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याबद्दल भावना व्यक्त केल्या. खान रईसा बेगम आणि अय्युब खान यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, सहकारी व मित्रपरिवाराचे आभार मानले.

आदिवासी समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी निवेदन



अजिंठा प्रतिनिधी : सन २०२६-२७ मध्ये न्यूक्लिअर बजेट योजनेंतर्गत आदिवासी युवक-युवतींसाठी पोलीस व सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण तात्काळ सुरू करण्यात यावे.

तसेच राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजना प्रभावीपणे राबवून आदिवासी महिलांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी माझ्या नेतृत्वाखाली संबंधित प्रकल्प अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक आदरणीय दीक्षित साहेब यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी माजी सरपंच राजेंद्र दांडगे , जाकीर तडवी, पाशा तडवी, बशीर तडवी, अमीन तडवी, इमरान तडवी, रऊफ तडवी व स्वर्गीय राम नाईक आदिवासी तडवी भिल्ल संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते तडवी समाज बांधव उपस्थित होते.

मराठी विभागात उद्या कवीसंमेलनाचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी भाषा व वाङ्•मय विभाच्या वतीने अभिजात मराठी भाषा दिवसानिमित्त आभासी पद्धतीने कवी संमेलनाचे म्हणजेच कविता वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कविता वाचन कार्यक्रमाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कवी व समीक्षक डॉ. सतीश मस्के हे राहणार आहेत. या कवी संमेलनामध्ये सहभागी कवी म्हणून डॉ. सुदाम राठोड, प्रा. रामप्रसाद वाव्हळ, प्रा. देवानंद पवार, राम जाधव, सौ. आरती डांगे, डॉ. सविता लोंढे, डॉ. संतोष राठोड आदी उपस्थित राहणार आहेत. या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन प्रा. केशरचंद राठोड हे करणार असून आभार डॉ.आकाश पवार मानणार आहेत. हा कविता वाचनाचा कार्यक्रम गुगल मीटवर ०३ ऑक्टोंबर रोजी दूपारी ३.०० वा घेण्यात येणार असल्याचे आयोजक विभागप्रमुख डॉ . रमेश जाधव, यांनी कळविले आहे.

गांधी जयंतीनिमित्त एलोरा इंग्रजी स्कूलमध्ये वक्तृत्व स्पर्धा



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : बीड बायपास रोडवरील एलोरा इंग्रजी हायस्कूल ॲण्ड सायन्स ज्युनिअर कॉलेजमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून गांधी व शास्त्री यांच्या कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या संगीता शिंदे यांच्या उपस्थितीत संस्थेचे सचिव प्रल्हाद शिंदे यांच्या हस्ते महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी वेदिका इंगळे आणि रोहिणी काथार यांनी दोन्ही नेत्यांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

वक्तृत्व स्पर्धेत प्रणवी चव्हाण, वैष्णवी गायके, स्वरा घोले, अक्षरा चंदनशिव, रिद्धी सोहळे आणि श्री पारिख यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट भाषणे केली. विद्यार्थ्यांच्या भाषणातून गांधीजींचे सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेचे विचार तसेच लालबहादूर शास्त्री यांचे साधेपणा, प्रामाणिकपणा आणि देशसेवेचे कार्य अधोरेखित झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी काथार यांनी केले. अश्विनी काळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हरजीत कौर सौदी, निलाक्षी राव आणि अजिंक्य शिंदे यांनी परिश्रम घेतले.

घाटीसह जिल्हा रुग्णालयाची शुक्रवारी ओपीडी बंद; अपघात विभाग 24 तास सुरू

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी जयंतीनिमित्त शुक्रवारी (२ ऑक्टोबर) शासकीय सुट्टी असल्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) तसेच जिल्हा रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) बंद राहणार आहे. मात्र, आपत्कालीन वैद्यकीय सेवा सुरू राहणार असून अपघात विभाग २४ तास कार्यरत राहणार आहे.

घाटी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे यांनी ही माहिती दिली. शनिवारी (३ ऑक्टोबर) घाटीची ओपीडी नेहमीप्रमाणे सुरू राहणार आहे. तसेच जिल्हा रुग्णालयाची ओपीडीही शुक्रवारी बंद राहणार असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर यांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांनी शुक्रवारी नियमित उपचारांसाठी रुग्णालयात येताना याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

एमजीएमच्या स्वयंचलित फिंगरप्रिंट उपकरणाला पेटंट

अस्पष्ट, अर्धवट ठसे घटनास्थळीच विकसित करण्याची सुविधा; फॉरेन्सिक तपासासाठी ठरणार उपयुक्त

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : गुन्ह्याच्या तपासात महत्त्वाचा भौतिक पुरावा ठरणारे अस्पष्ट व अर्धवट बोटांचे ठसे घटनास्थळीच अधिक स्पष्ट करण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या 'ऑटोमेटेड फिंगरप्रिंट प्रोसेसिंग डिव्हाइस'च्या डिझाईनला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट प्राप्त झाले आहे. विद्यापीठाच्या फॉरेन्सिक सायन्स विभागाचे विभागप्रमुख डॉ. मोहम्मद खाजा मोईनुद्दीन सिद्दीकी, सहाय्यक प्राध्यापक प्रा. गौरव वराडे आणि सहाय्यक प्राध्यापक प्रा. प्रशांत पट्टेकर यांनी हे संशोधन केले आहे.



गुन्हेगारी तपासात घटनास्थळावरून मिळणारे बोटांचे ठसे महत्त्वाचे पुरावे मानले जातात. मात्र धूळ, रक्त किंवा अन्य पदार्थांमुळे माखलेले तसेच अर्धवट असलेले ठसे स्पष्ट करणे तपास यंत्रणांसमोर आव्हान ठरते. या समस्येवर उपाय म्हणून संशोधकांनी स्वयंचलित फिंगरप्रिंट प्रोसेसिंग डिव्हाइसची संकल्पना व डिझाईन विकसित केले आहे.

सध्या फिंगरप्रिंट विकसित करण्यासाठी सायनोॲक्रिलेट फ्युमिंग, पावडर डस्टिंग, विविध रासायनिक प्रक्रिया तसेच स्वतंत्र उपकरणांचा वापर केला जातो. या प्रक्रियांमध्ये वेळ, मनुष्यबळ आणि विविध संसाधनांची आवश्यकता असते. नव्या उपकरणाच्या माध्यमातून अस्पष्ट किंवा अर्धवट फिंगरप्रिंट घटनास्थळीच अधिक सुलभ पद्धतीने विकसित करण्याची संकल्पना मांडण्यात आली आहे.

हे उपकरण पोर्टेबल आणि बॅटरीवर चालणारे असल्याने घटनास्थळीच त्याचा वापर करता येण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुरावा प्रयोगशाळेत नेण्यापूर्वीच प्राथमिक प्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध होऊ शकते. स्वयंचलित प्रक्रियेमुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पुराव्याची हाताळणी आणि त्यातील संभाव्य त्रुटी कमी करण्यास मदत होऊ शकते. संशोधकांच्या माहितीनुसार, पारंपरिक पद्धतीने फिंगरप्रिंट विकसित करण्यासाठी काही तासांचा कालावधी लागू शकतो. या उपकरणाच्या माध्यमातून ही प्रक्रिया काही मिनिटांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच उच्च-रिझोल्यूशन फिंगरप्रिंट प्रतिमा मिळविण्याच्या दृष्टीने उपकरणाची रचना करण्यात आली आहे.

या तंत्रज्ञानाचा भविष्यात महाराष्ट्र पोलीस, गुन्हे अन्वेषण विभाग, राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो, केंद्रीय अन्वेषण विभाग, फिंगरप्रिंट ब्युरो आणि न्यायवैद्यक प्रयोगशाळांना उपयोग होण्याची शक्यता आहे. फॉरेन्सिक सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी आणि संशोधकांसाठीही हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

पोलिस हक्क संघर्ष संघटनेच्या शहराध्यक्षपदी शेख मोहम्मद इमरान



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - पोलिस हक्क संघर्ष संघटना महाराष्ट्र राज्याच्या छत्रपती संभाजीनगर शहराध्यक्षपदी शेख मोहम्मद इमरान यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा ॲड. जेबा अब्दुल कदीर शेख यांच्या आदेशानुसार ही महत्त्वाची नियुक्ती करण्यात आली आहे.नुकताच पार पडलेल्या एका स्वागत सोहळ्यात संस्थापक अध्यक्षा ॲड. जेबा अब्दुल कदीर शेख यांच्या हस्ते शेख मोहम्मद इमरान यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी व पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत व अभिनंदन केले तसेच त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस आणि नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्यात.

या प्रसंगी संघटनेचे राष्ट्रीय सचिव शेख अब्दुल कदीर, राजेंद्र लहाने, राज्य उपाध्यक्ष मुस्तफा खान तसेच राज्य सचिव तथा पत्रकार नजीमोद्दीन काजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी, शेख मोहम्मद इमरान यांनी संघटनेची विचारधारा आणि उद्दिष्टे लक्षात घेऊन शहरात प्रभावीपणे काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच, छत्रपती संभाजीनगर शहरात संघटनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासोबतच पोलिस कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या विविध अडीअडचणी व प्रश्न योग्य व्यासपीठावर मांडण्यासाठी त्यांनी सक्रिय भूमिका बजावावी, असा सूर यावेळी उमटला.

जिल्ह्यात नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी 50 परीक्षा केंद्रे निश्चित

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

देशातील अत्यंत प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा यंदा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अतिशय सुरळीत, पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी संपूर्ण जिल्ह्यात तालुकानिहाय एकूण ५० परीक्षा केंद्रांची अंतिम निश्चिती करण्यात आली असून, प्रशासनाने परीक्षा पूर्वतयारीला अंतिम रूप दिले आहे. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील सर्व ९ तालुक्यांमध्ये विद्यार्थ्यांच्या सोयीचा विचार करून परीक्षा केंद्रांचे वितरण करण्यात आले आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर तालुक्यात सर्वाधिक ११ केंद्रे निश्चित करण्यात आली असून, त्यात शिशुविहार हायस्कूल (औरंगपुरा), लिटल फ्लॉवर हायस्कूल व होली क्रॉस इंग्लिश/मराठी हायस्कूल (कॅन्टोन्मेंट/छावणी), उज्वलाताई पवार इंग्लिश हायस्कूल, चाटे इंग्लिश स्कूल व एंजल किड्स इंटरनॅशनल स्कूल (सातारा परिसर), सेंट फ्रान्सिस हायस्कूल (जालना रोड), वुडरिज हायस्कूल (कांचनवाडी), तसेच माँटेसरी बालक मंदिर व गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिर (औरंगपुरा) यांचा समावेश आहे. याशिवाय खुलताबाद तालुक्यात २, कन्नड तालुक्यात ८, सोयगाव तालुक्यात १, सिल्लोड आणि पैठण तालुक्यात प्रत्येकी ७, गंगापूर तालुक्यात ६, वैजापूर तालुक्यात ५ तर फुलंब्री तालुक्यात ३ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

परीक्षेच्या दिवशी विद्यार्थ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाने विद्यार्थी आणि पालकांना महत्त्वपूर्ण सूचना केल्या आहेत. सर्व परीक्षार्थी आणि त्यांच्या पालकांनी आपल्या प्रवेशपत्रावरील परीक्षा केंद्राचे नाव आणि सविस्तर पत्ता अत्यंत काळजीपूर्वक तपासावा, जेणेकरून परीक्षेच्या दिवशी गोंधळ उडणार नाही. परीक्षार्थींनी परीक्षेच्या दिवशी आवश्यक कागदपत्रांसह निर्धारित वेळेपूर्वीच संबंधित परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे. परीक्षा केंद्रावर पोहोचल्यानंतर प्रशासनाकडून आणि परीक्षा अधीक्षकांकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाद्वारे करण्यात आले आहे.

भाईजींच्या वाढदिवसा निमित्ताने वस्त्र व अन्नदान



सोयगाव,दि.१ ऑक्टोबर -संत गजानन महाराज महाप्रसाद समिती प्रत्येक गुरुवारी सरकारी दवाखान्यात पेशंटच्या नातेयकांसाठी अन्नदान करीत असते. हा उपक्रम १३ वर्षापासून सातत्याने व स्फूर्तीपणे चालू आहे.आज ६४८ वा सप्ताहाचे गुरुवारचे अन्नदान भाईजींच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त करण्यात आले.सर्वप्रथम भाईजींनी संत गजानन महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पन केले. गरजू महिलांना वस्त्राचे वितरण केले. भाईजींनी अन्नदान वितरण केले. ५०० ते ६०० गरजूंनी व पेशंटच्या नातेवाईकांनी महाप्रसाद घेतला. भाईजींनी सर्व वृद्धांनी व गरजूंनी भरभरून शुभाशीर्वाद दिले व उत्तम आरोग्य लाभो अशी कामना केली.सर्वकऱ्यांतर्फे भाईजींचे शाल देऊन सत्कार करण्यात आला.वाढदिवसानिमित्त जिवेत शरदः शतमः अशा शुभकामना दिल्या.माहेश्वरी युवा मंच बुलडाणा तसेच माहेश्वरी मंडळाचे सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. सर्वांनी भाईजींचे हार्दिक स्वागत करू शुभेच्छा दिल्या. अन्नदान करण्यात सहकार्य केले.पांचाळ केटर्स तेरा वर्षापासून महाप्रसाद ना नफा न तोटा या तत्त्वावर करून देतात.मनोज राजुरे आरओचे पिण्याचे पाणी निशुल्क देतात ,याशिवाय विजय वैद्य ,सुरेश गट्टाणी, रुपराव उज्जैनकर, गोपाल सिंग राजपूत ,प्रकाशचंद्र पाठक,तिजारे ,झगरे, वावगे, किशोर चांडक, संजय चोपडे,धनंजय चाफेकर ,मधुकर गायके, नम्रता पाटील, कऱ्हाळे,श्री व सौ वाणी ,कुसुंबे, नेहरू युवा केंद्राचे राजपूत, राहुल रायपुरे, सुधाकर कांबळे, तिलोकचंद चांडक, राठोड, मु ेहकर, अपार ,सांगळे महाराज, इत्यादी सहकाऱ्यांनी सहकार्य केले. नेत्र विभाग शासकीय रुग्णालय यांचे सहकार्य लाभले. महाप्रसादासाठी आमदार संजय गायकवाड यांनी ५० लाख रुपये शिदोरीगृह साठी दिले .५०% बांधकाम झाले आहे. लवकरच उपक्रम नवीन जागेस सुरू होईल. मयूर परमार नम्रता पाटील यांनी विषय सहकार्य केले.

मोबाइल ॲपवर फनगेम चक्री मटका ; तिघांवर गुन्हा दाखल

बोरी पोलिसांची कारवाई ; दोन मोबाइलसह 23 हजारांचा मुद्देमाल जप्त

बोरी (प्रतिनिधी) - गावातील अपना नगर परिसरात मोबाइल ॲपच्या माध्यमातून फनगेम चक्री नावाचा मटका जुगार सुरू असल्याचे आढळून आल्याने बोरी पोलिसांनी बुधवारी (दि.३०) कारवाई केली. या कारवाईत जुगार खेळविणाऱ्या व खेळणाऱ्या तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून दोन मोबाइल व रोख रकमेसह एकूण २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी बोरी पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोरी शहरातील अपना नगर मशिदीजवळील सार्वजनिक रस्त्यावर बुधवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास काहीजण मोबाइल ॲपच्या माध्यमातून फनगेम चक्री नावाचा मटका जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन कारवाई केली. यावेळी युनुस युसुफ शेख (वय ४२, रा. पेठ गल्ली, बोरी), अमोल गणेशराव चौधरी (वय २९, रा. पेठ गल्ली, बोरी) आणि गजानन हरीभाऊ नाईक (वय ३५, रा. केशवनगर, बोरी) हे पोलिसांना मिळून आले. या कारवाईत युनुस शेख याच्याकडून रेडमी कंपनीचा जुना मोबाइल, अंदाजे आठ हजार रुपये किमतीचा, तसेच रोख तीन हजार रुपये जप्त करण्यात आले. अमोल चौधरी याच्याकडून पाचशे रुपयांच्या चार नोटांसह दोन हजार रुपये रोख रक्कम मिळून आली. तर गजानन नाईक याच्याकडून ओप्पो कंपनीचा जुना मोबाइल, अंदाजे दहा हजार रुपये किमतीचा, जप्त करण्यात आला. अशा प्रकारे दोन मोबाइल व रोख रकमेसह एकूण २३ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. याप्रकरणी पोलीस शिपाई प्रकाश लिंबाजी मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बोरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी नागरिकांकडून पैसे स्वीकारून मोबाइल ॲपच्या माध्यमातून मटका जुगार खेळल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम ३०२(२) तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यातील संबंधित तरतुदींनुसार कारवाई करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वामी यांच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस शिपाई सय्यद करीत आहेत. गुन्हा दाखल करण्याची कारवाई पोलीस हवालदार साळवणे यांनी केली. दरम्यान, तिन्ही आरोपींना नोटीस देऊन सोडण्यात आले आहे.

पागोटे–चौक ग्रीनफिल्ड महामार्गाच्या भूसंपादनास बाधित शेतकऱ्यांचा विरोध; उपविभागीय अधिकारी पनवेल यांना निवेदन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



उरण /रायगड / राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३४८ अंतर्गत प्रस्तावित पागोटे–चौक जंक्शन ग्रीनफिल्ड महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेला बाधित शेतकरी व जमीनमालकांनी विरोध दर्शविला आहे. याबाबत पागोटे–चौक ग्रीनफिल्ड जंक्शन महामार्ग संघर्ष समितीच्या माध्यमातून बाधित शेतकऱ्यांनी पनवेल येथील उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांची भेट घेऊन विविध मागण्या व हरकती मांडत निवेदन दिले.

पनवेल, उरण आणि खालापूर परिसरातील बाधित शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, महामार्गासंदर्भातील आवश्यक सूचना अनेक शेतकरी व जमीनमालकांना प्राप्त झाल्या नसल्याने त्यांना वेळेत लेखी हरकत नोंदविता आली नाही. त्यामुळे शासनाकडे हरकत व म्हणणे मांडण्याचा त्यांचा अधिकार अबाधित ठेवावा, अशी मागणी करण्यात आली.

महामार्गाचे नियोजन करण्यापूर्वी बाधित शेतकरी, ग्रामपंचायती तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना विश्वासात घेणे आवश्यक होते, अशी भूमिका शेतकऱ्यांनी मांडली. प्रस्तावित महामार्गासाठी संपादित होणारी जमीन सुपीक असून ती अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महामार्गाच्या कामामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड, जमीन उत्खनन व इतर बांधकाम प्रक्रिया होण्याची शक्यता असल्याने पर्यावरणावर तसेच स्थानिक नागरिकांच्या जीवनमानावर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, काही बाधित शेतकऱ्यांना मोबदला स्वीकारण्याबाबत नोटिसा बजावण्यात आल्या असून, त्यामध्ये नमूद केलेले दर अत्यल्प असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. परिसरात जेएनपीटी, तिसरी मुंबई, नवी मुंबई विमानतळ, मुंबई–गोवा महामार्ग, मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग तसेच इतर महत्त्वाचे प्रकल्प व मार्ग असल्याने जमिनीचे बाजारमूल्य अधिक असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

तसेच भूसंपादनाचा उद्देश समान असताना विविध जमिनींसाठी मोबदल्याच्या दरात तफावत का, असा सवाल उपस्थित करण्यात आला. सर्व बाधित शेतकऱ्यांना न्याय्य व समान निकषांवर मोबदला मिळावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यायकारक मोबदला स्वीकारण्यास शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे.

या पार्श्वभूमीवर प्रस्तावित महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेबाबत बाधित शेतकरी व जमीनमालकांनी आपल्या हरकती प्रशासनासमोर मांडल्या असून, शासनाने सर्व संबंधितांची बाजू ऐकून न्याय्य निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पाटील, ॲड. राजेंद्र मढवी, प्रभाकर पाटील, जितेंद्र पाटील, दशरथ पाटील, दामोदर पाटील, नाशिकेत जोमा कोळी, बालाजी चांग्या कोळी, रामदास हशा पाटील, विलास मधुकर कोळी, राजेश चांग्या कोळी, लक्ष्मी हरिश्चंद्र चौगुले, उमेश जमा कोळी, केशव नारायण कोळी, केशव पाटील, नामूबाई हरिश्चंद्र कोळी, दामोदर बालाराम पाटील यांच्यासह बहुसंख्य बाधित शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

ह. भ. प कारभारी शेलार यांचे निधन



कन्नड - तालुक्यातील रोहला खुर्द व निपाणी येथील रहीवाशी ह भ प कारभारी भावराव पा . शेलार महाराज यांचे बुधवार दि 30 रोजी सायंकाळी 8 वाजता निधन झाले.ते (वय 82) वर्षाचे होते. त्यांच्यावर तेथील स्मशानभूमीत गुरुवार रोजी सकाळी 11 वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले . त्यांच्या पश्चात पत्नी दोन मूले ,तीन मूली, सूना नातवंडे असा परीवार आहे , राजेंद्र शेलार व विठ्ठल शेलार यांचे ते वडील होते ,ते राष्ट्रसंत जगतगूरू जनार्दन स्वामी यांचे शिष्य होते ,त्यांच्या अत्यसंस्कारास जय बाबाजी परीवार तसेच तालुक्यातील भक्त परीवार व महाराज मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

भिकुखा यासीनखा सिक्कलकर यांचे निधन




शिवना, ता. १ (बातमीदार): येथिल ज्येष्ठ नागरिक भिकुखा यासीनखा सिक्कलकर (वय ८९) यांचे बुधवारी (ता. तीस) रात्री अकराच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गुरुवारी सकाळी अकराला त्यांचेवर दफनविधी करण्यात येणार आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

वैद्यकीय शिक्षणातील अध्यापन कौशल्यांना मिळाला नवा आयाम

घाटीत 'बेसिक कोर्स इन मेडिकल एज्युकेशन' कार्यशाळा; 30 प्राध्यापकांचा सहभाग



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) वैद्यकीय शिक्षकांच्या अध्यापन कौशल्यांना अधिक प्रभावी करण्यासाठी 'बेसिक कोर्स इन मेडिकल एज्युकेशन' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी एक प्राध्यापक, पाच वरिष्ठ निवासी डॉक्टर आणि २४ सहायक प्राध्यापक अशा एकूण ३० जणांनी सहभाग घेतला.

कार्यशाळेत अध्यापन व अध्ययनाच्या विविध पद्धती, क्षमताधिष्ठित वैद्यकीय शिक्षण, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन, प्रभावी अभिप्राय आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. सहभागी शिक्षकांसाठी विविध सत्रांसोबतच गटचर्चा, कृतीआधारित उपक्रम आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले. त्यामुळे प्रत्यक्ष अध्यापनातील अडचणी, प्रभावी अध्यापन तंत्र आणि विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेबाबत सहभागी शिक्षकांना संवादातून मार्गदर्शन मिळाले.

एनएमसी समन्वयक डॉ. राकेश पाटील तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या एनएमसी समन्वयक डॉ. अंजली शेटे यांच्या समन्वयातून कार्यशाळेचे नियोजन व आयोजन करण्यात आले. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पथकाने कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी योगदान दिले. समारोपप्रसंगी सहभागी शिक्षकांनी कार्यशाळेतील अनुभव आणि मनोगत व्यक्त केले. संवादात्मक सत्रे व कृतीआधारित उपक्रम भविष्यातील अध्यापनासाठी उपयुक्त ठरतील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी सहभागी शिक्षकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

'वाल्मी'ने आधुनिक तंत्रज्ञानासह प्रशिक्षण द्यावे

कौशल्य, तंत्रज्ञान आणि 'एआय'चा वापर वाढविण्याची गरज; मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचे प्रतिपादन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जल आणि भूमी व्यवस्थापन संस्था अर्थात 'वाल्मी'ने भविष्यातील आव्हाने लक्षात घेऊन पारंपरिक प्रशिक्षण पद्धतीसोबत कौशल्य, आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय'चा वापर वाढवावा. प्रशिक्षण अधिक परिणामकारक आणि काळानुरूप करून संस्था अधिक सक्षम व्हावी, अशी अपेक्षा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी गुरुवारी (१ ऑक्टोबर) व्यक्त केली.

'वाल्मी'च्या ४७व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मंत्री राठोड ऑनलाइन माध्यमातून प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी झाले होते. यावेळी मृद व जलसंधारण आयुक्त प्रतिभा इंगळे, प्रगतिशील शेतकरी बाबुलाल पटेल, संस्थेचे महासंचालक इंजि. सुनील कुशिरे, अधीक्षक अभियंता तथा सहसंचालक इंजि. एस. सी. कापगते आणि प्रमुख प्रा. डॉ. डी. जी. दुरबुडे यांची उपस्थिती होती.

राठोड म्हणाले, 'वाल्मी'ने आपल्या कौशल्य आणि अनुभवाच्या जोरावर अभियंते तसेच शेतकऱ्यांना दर्जेदार प्रशिक्षण देत भूमी व जल व्यवस्थापन सक्षम करण्याची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली आहे. जलस्रोतांचे योग्य नियोजन करून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने आणि कार्यक्षम वापर कसा करता येईल, याचे प्रशिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करता प्रशिक्षण घेणाऱ्या अभियंते आणि कर्मचाऱ्यांनी शेतकरी व नागरिकांना मार्गदर्शन करून जलसंधारणाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. गावागावांत भूमी व जलसंधारणाबाबत जनजागृती निर्माण करून उपलब्ध संसाधनांचा शाश्वत वापर करण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी सांगितले.

जल आणि भूमी ही देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी महत्त्वाची साधने आहेत. त्यांचे जतन व संवर्धन करूनच शाश्वत विकास साधता येईल. जमिनीची धूप रोखणे, सुपीक जमीन व जलसाठे निर्माण करणे आणि त्यांचा कार्यक्षम वापर करणे आवश्यक आहे. यंदापासून जलसंधारण दिनाच्या माध्यमातून जनजागृतीला सुरुवात करण्यात आली असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्यासाठी मृद व जलसंधारण विभाग काम करीत आहे. हवामान बदलाच्या आव्हानांनाही विभागाकडून प्रभावीपणे सामोरे जाण्यात येईल, अशी ग्वाही राठोड यांनी दिली.

'वाल्मी'च्या विकासासाठी २५५ कोटींचा आराखडा

महासंचालक इंजि. सुनील कुशिरे यांनी सांगितले की, 'वाल्मी'मध्ये प्रशिक्षणार्थींना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. संस्थेच्या विकासासाठी २५५ कोटी रुपयांचा विकास आराखडा शासनाकडे सादर करण्यात आला असून, त्याला लवकरच मंजुरी मिळण्याची अपेक्षा आहे.

आयुक्त प्रतिभा इंगळे यांनी 'वाल्मी'ने नवनवीन प्रयोग करून आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे सांगितले. प्रगतिशील शेतकरी बाबुलाल पटेल यांनी संस्थेच्या शेतकरी प्रशिक्षण उपक्रमाचे कौतुक केले.

५६ जणांचे रक्तदान

स्थापना दिनाच्या प्रारंभी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन झाले. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच संस्थेत नव्याने सुरू करण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.

'वाल्मी' आणि दत्ताजी भाले रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ५६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. प्रशिक्षण घेत असलेल्या मृद व जलसंधारण विभागाच्या अभियंत्यांनी 'माझे आदर्श गाव' या लघुनाट्याचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहसंचालक इंजि. एस. सी. कापगते यांनी केले. 'भविष्यातील वाल्मी' या विषयावर प्रा. डॉ. डी. जी. दुरबुडे यांनी सादरीकरण केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. हर्षदा देशमुख यांनी, तर आभार प्रा. रुपाली गोरे यांनी मानले.

रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी वाल्मीचे प्रा. अनिल जाधव, प्रा. डॉ. मोहन नारखेडे, दत्ताजी भाले रक्तपेढीचे डॉ. निवृत्ती बानोळे, राधा पठाडे, गजानन वाघ, रेखा वडजे, रेखा दिवटे, वैभव डाके, आरती बामने आणि सुनिता पगारे यांनी परिश्रम घेतले.

घाटीसमोर साकारणार 'उमेद मॉल'; जिल्ह्याचा प्रस्ताव शासनाकडे

महिला बचतगटांच्या उत्पादनांना मिळणार हक्काची बाजारपेठ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ग्रामीण भागातील महिलांच्या हाताला रोजगार देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणाऱ्या महिला स्वयंसहायता समूहांच्या उत्पादनांना आता शहरात मोठी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या (उमेद) माध्यमातून ग्रामीण महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तू व खाद्यपदार्थांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 'उमेद मॉल' उभारण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. घाटी रुग्णालयासमोर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या रस्त्यालगतच्या जागेवर हा मॉल उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

राज्याच्या ग्रामविकास विभागाने राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल उभारण्यास मंजुरी दिली असून, प्रत्येक मॉलच्या बांधकाम व फर्निचरसाठी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

डी-मार्टच्या धर्तीवर विक्री व्यवस्था

प्रस्तावित उमेद मॉलमध्ये महिला स्वयंसहायता समूहांनी तयार केलेल्या उत्पादनांसाठी स्वतंत्र व आकर्षक स्टॉल उभारण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील पारंपरिक वस्तू, खाद्यपदार्थ, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ तसेच विविध स्थानिक उत्पादनांना येथे बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाणार आहे. उत्पादनांचे आकर्षक पॅकेजिंग करण्यासाठीही महिलांना मदत केली जाणार आहे.

मॉलच्या तळमजल्यावर सामानासाठी गोदामाची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच ग्राउंड फ्लोअरवरील ३० टक्के जागा व्यावसायिक वापरासाठी भाडेतत्त्वावर देण्याचे नियोजन आहे. उर्वरित जागेसह पहिल्या मजल्यावर ग्रामीण महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची विक्री करण्यासाठी डी-मार्टच्या धर्तीवर नियोजन करण्यात आले आहे. ग्राहकांची खरेदी पूर्ण झाल्यानंतर त्यांना खाद्यपदार्थांचा आस्वाद घेता यावा, यासाठी दुसऱ्या मजल्यावर फूड झोन प्रस्तावित आहे.

५० चारचाकी, १०० दुचाकींची पार्किंग

मॉलमध्ये येणाऱ्या ग्राहकांच्या वाहनांसाठीही पुरेशी सुविधा प्रस्तावित करण्यात आली आहे. सुमारे ५० चारचाकी आणि १०० दुचाकी वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. घाटी रुग्णालयासमोरील मध्यवर्ती ठिकाणी हा मॉल प्रस्तावित असल्याने शहरातील ग्राहकांसाठी येथे पोहोचणे आणि खरेदी करणे सोयीचे होणार आहे.

जिल्ह्याचा हा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी. एम. आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक वासुदेव सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला. बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता किरण धनके, शाखा अभियंता शुभम शिंदे, जिल्हा व्यवस्थापक विक्रम सरगर आणि जिल्हा व्यवस्थापक (मार्केटिंग) सचिन सोनवणे यांनी प्रस्तावाच्या कामात सहभाग घेतला. जिल्ह्याचे आर्किटेक्ट विष्णू कुंजर यांच्या माध्यमातून मॉलचा आराखडा तयार करून शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

मनपा शाळांमध्ये वाचनाची गोडी; सात शाळांतील २१० विद्यार्थ्यांचा सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय रुजवून त्यांची आकलन क्षमता आणि विचारशक्ती विकसित करण्यासाठी महापालिकेच्या सात शाळांमध्ये 'एक तास वाचन' उपक्रम राबविण्यात येत आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोक कल्याण अभियानांतर्गत मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या सूचनेनुसार हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

सिडको एन-७, नारेगाव, मुकुंदवाडी, हर्सूल, इंदिरानगर-बायजीपुरा, अशोकनगर आणि बनेवाडी येथील मनपा शाळांमध्ये आठवड्याच्या प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या वर्गांसाठी वाचनाचे नियोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना शाळेतील वाचनालयातील पुस्तके, ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे तसेच पाठ्यपुस्तकांचे वाचन करण्याची संधी दिली जात आहे.

वाचनानंतर १५ मिनिटे शिक्षक



आणि मुख्याध्यापक विद्यार्थ्यांशी वाचलेल्या साहित्यावर संवाद साधतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ वाचनाची सवय लागत नसून वाचलेल्या मजकुराचे आकलन, विचार मांडण्याची क्षमता आणि चिकित्सक विचार विकसित होण्यासही मदत होत आहे. आज सातही शाळांमधील इयत्ता सातवीच्या एकूण २१० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील आणि उपआयुक्त तथा शिक्षण विभागप्रमुख अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे यांनी उपक्रमाचे नियोजन केले आहे. मुख्याध्यापक संतोष तपकिरे, संपत ईधाते, जगन्नाथ सपकाळ, तिलोत्तमा मापारी, अशोक उदावंत, प्रवीण नरवाडे, मनोज अग्रवाल यांच्यासह शिक्षकांकडून उपक्रमाची अंमलबजावणी केली जात आहे.

बोरगाव येथील शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सुभाष हिवराळे, उपाध्यक्षपदी सुनीता अवधूत

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर



पैठण तालुक्यातील ढोरकीन केंद्रातंर्गत येणाऱ्या बोरगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सुभाष रतन हिवराळे व उपाध्यपदी सुनीता सोमीनाथ अवधूत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. ही निवड गुरूवारी (१ ऑक्टोबर) झालेल्या पालक सभेत करण्यात आली.

यावेळी पालकसभेच्या अध्यक्षस्थानी सुनील शेळके हे होते. तर निरीक्षक म्हणून ढोरकिन केंद्राचे केंद्रप्रमुख आप्पासाहेब पवार, रमेश दगडू हिवराळे, उपसरपंच सखाराम बोबडे, मारोती बोबडे, साईनाथ अवधूत, मुख्याध्यापक संतोष पवार, शिक्षक दत्तात्रय सपाटे, सुनीता ढोले, कृष्णवेणी गोंदवाड , स्नेहल वैद्य उपस्थित होते. यावेळी शालेय समितीच्या कार्यकारिणीत अध्यक्षपदी सुभाष रतन हिवराळे, उपाध्यक्षपदी सुनीता सोमीनाथ अवधूत, सदस्यपदी शारदा राजेंद्र नवले, आरती मदन आमले, रेणुका भरत आमले, सुनीता सोमीनाथ बोडखे, शेख अनिस कदिर, सखू बद्रीनाथ बोबडे, रामेश्वर संजय रिठे, आदिनाथ शामराव निकम, अनिस कदिर शेख, संदीप कल्याण आमले, शरद ईश्वर बोबडे. शिक्षण तज्ञ म्हणून जगदीश लक्ष्मण बोबडे यांचा समावेश आहे. या नवनिर्वाचित सदस्यांचे ग्रामस्थांच्या व उपस्थितांच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.

जालन्यात 'एक दिवस, एक तास, एक सोबत' उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

जालना -केंद्र शासनाच्या 'स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)' अंतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभरात 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियान अतिशय उत्साहात राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत 'स्वच्छतेमध्ये सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत' ही अत्यंत महत्त्वपूर्ण संकल्पना ठेवण्यात आली असून, याच संकल्पनेला केंद्रस्थानी मानत जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया यांनी जिल्ह्यातील जनतेला एक विशेष आवाहन केले होते. त्यांच्या या हाकेला साद देत संपूर्ण जालना जिल्ह्यात 'एक दिवस, एक तास, एक सोबत' या अभिनव उपक्रमांतर्गत सामूहिक श्रमदानाचे विक्रमी आयोजन करण्यात आले. या उपक्रमात जिल्ह्यातील गावोगावकडच्या नागरिकांनी कोणतीही औपचारिकता न बाळगता उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, ज्यामुळे या स्वच्छता मोहिमेला खऱ्या अर्थाने एका जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.



जिल्ह्यातील प्रत्येक गावात गटविकास अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतींनी अत्यंत नियोजनबद्ध रितीने या मोहिमेची अंमलबजावणी केली. ग्रामस्थ, महिला बचत गटांच्या उत्साही महिला, युवक मंडळांचे तरुण कार्यकर्ते, विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांनी एकजुटीने पुढे येत आपापला परिसर स्वच्छ केला. गावांतर्गत जाणारे मुख्य रस्ते, बसस्थानक परिसर, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा आणि महाविद्यालयीन परिसर, ऐतिहासिक वा मंदिरे, प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी आणि इतर सार्वजनिक ठिकाणांची कसून स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेदरम्यान चौकाचौकांत आणि सार्वजनिक स्थळांवर साचलेला कचरा, प्लॅस्टिक पिशव्या व टाकाऊ वस्तू गोळा करून त्यांची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. केवळ कचरा साफ करणे एवढ्यापुरतेच हे अभियान मर्यादित न ठेवता, स्वच्छता ही कुठल्याही एका दिवसाची तात्पुरती मोहीम नसून ती मानवी जीवनाचा आणि आरोग्याचा अविभाज्य भाग बनली पाहिजे, हा मोलाचा संदेश यावेळी गावकऱ्यांना देण्यात आला.

या व्यापक श्रमदान मोहिमेमध्ये जिल्हाभरातून विविध घटकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. यामध्ये सर्व संबंधित तालुक्यांचे गटविकास अधिकारी, तालुकास्तरीय विभागप्रमुख, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, एनसीसी व नेहरू युवा केंद्राचे तरुण सदस्य तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपमुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन आणि यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली. या सामूहिक प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये स्वच्छतेबद्दल आणि आरोग्याबद्दल मोठी जनजागृती निर्माण झाली असून, जालना जिल्ह्याने स्वच्छता अभियानात एक आदर्श उदाहरण निर्माण केले आहे.

कुंभार समाजाच्या वतीने गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर : कुंभार समाज सामाजिक संस्था, महाराष्ट्र प्रदेश संलग्न राज्यस्तरीय मेळावा तसेच सकल कुंभार समाज सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'जिवन गौरव समाजभूषण गुणगौरव सोहळा' आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती म्हणून महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच समाजातील ज्येष्ठ व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना जीवनगौरव पुरस्कार' आणि 'समाजभूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



जीवनगौरव पुरस्कारासाठी मा. श्री. नामदेवजी मरकड व सौ. ध्रुवदाबाई नामदेवजी मरकड तसेच मा. श्री. उमाजी दादुबा सूर्यवंशी व सौ. शोभा उमाजी सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे समाजभूषण पुरस्कारासाठी मा. श्री. दिगंबर किसनराव सोनवणे, मा. श्री. दिगंबर रघुनाथ वारे, मा. श्री. बाबुराव किसनराव राठोड आणि मा. श्री. गणेश हरिश्चंद्र रोकडे यांचा गौरव करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. ना. श्री. अतुलजी सावे साहेब (आदिवासी मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सतीश दादा देरेकर (संस्थापक अध्यक्ष) राहणार आहेत. कार्यक्रमास विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

हा गुणगौरव सोहळा शुक्रवार, दि. ०२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे स्थळ कुलस्वामिनी मंगल कार्यालय, एन-६, सिडको, मधुरानगर, आझाद चौक, छत्रपती संभाजीनगर हे आहे. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

कुंभार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक कार्याला बळ देणारा हा सोहळा असून समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

पैसे न दिल्याच्या रागाने मुलाने केले वडिलावर वार

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

परभणी:- सदरील घटना शेतीच्या खरेदी विक्रीतून मुलगा वडील यांच्या घडली असून तुम्ही मला पैसे देत नाहीत सर्व जमिनीचे मिळालेले पैसे दोन्ही मुलांना देतात तुम्ही दोन्ही मुलाचा जास्त लाड करता हो माझ्यावर अन्याय करता आज मी तुम्हाला जिवंत सोडत नाही असे म्हणत रागाच्या भरात मुलाने वडीलावर हातातील कुऱ्हाडीने वार करत गंभीर जखमी केले सदरील ही घटना दिनांक 27 सप्टेंबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास सेलू तालुक्यातील राजवाडी येथे घटना घडली .

उपचारादरम्यान दिलेल्या तक्रारीनुसार गुरुवार रोजी सेलू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रघुनाथ गायकवाड यांनी तक्रार दिली आहे त्यांच्या नावे राजवाडी शिवारातील असलेली शेती विकून काही रक्कम आली दिनांक 27 सप्टेंबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास फिर्यादी व त्यांच्या पत्नी घरी असताना मुलगा आकाशाला त्याने विक्री केलेल्या जमिनीचा मधील दोन लाख रुपये मला द्या असे म्हणत वाद घालण्यास सुरुवात केली रजिस्ट्री झाल्याने पैसे देतो असे उत्तर दिल्याने वडिलांचे उत्तर ऐकून रागाच्या भरात वडिलांना जीवे मारण्याच्या उद्देशाने हातातील कुऱ्हाडी ने वडिलावर हल्ला केला व या मध्ये फिर्यादी गंभीर जखमी झाले झटापटीमध्ये फिर्यादीच्या पत्नीने मुलाच्या हातातील कुऱ्हाड हिसकावून घेतल्याने व जखमीला सुरुवातीला सेलू रुग्णालयात आणण्यात आले तेथून पुढील उपचारासाठी परभणी येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले जीवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला केल्याप्रकरणी आकाश रघुनाथ गायकवाड यांच्यावर सेलू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत .

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911